MHWS080011402025

फौ.किर.अर्ज क्र.१२७/२०२५

निकीता वि. अनिल

## <u>निशाणी क्र.११ खालील आदेश</u>

अर्जदारातर्फे सदरचा अर्ज गैरअर्जदार  याचे पगारपत्रक संबंधीत विदयालयातून मागवणेबाबत आदेश होउन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२** अर्जदाराचे अर्जातील कथनानुसार, गैरअर्जदार  हा योगानंद सरस्वती विदयालय वसमत येथे शिक्षक या पदावर कार्यरत आहे. त्यांचे पगारपत्रक विदयालयाच्या मुख्याध्यापकांकडून बोलावणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करुन गैरअर्जदार  यांचे पगारपत्रक बोलावण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

**०३** सदर अर्जावर गैरअर्जदार यांनी म्हणणे दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जास सक्त विरोध असून अर्ज नियमानुसार नाही. अर्जातील कारण योग्य व संयुक्तीक नाही. अर्जदाराच्या वतीने कोणताही पाठपुरावा न करता सदरचा अर्ज कायदेशीर तरतुदीअन्वये दिलेला नाही. त्यामुळे तो खारीज करावा अशी विनंती केली.

**०४** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज बी.एन.एस.एस. कलम १४४ नुसार पोटगीकरीता दाखल केलेला असून गैरअर्जदार  हा शिक्षक असल्याचे, त्याला दरमहा १ लाख रुपये इतका पगार असल्याचे व अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे सांभाळ करत नसल्याचे कथन केलेले आहे. गैरअर्जदार याने नि.क्र.१० वर लेखी जबाब दाखल करुन गैरअर्जदार  हा मानधन तत्वावर मिळणाऱ्या तुटपुंज्या वेतनावर गुजरान करत असल्याचे नमूद केलेले आहे. अर्जदार हिचे मूळ अर्जाचे कामी दरमहा खाणावळीबाबत मागणी नमूद केलेली असून अंतरिम पोटगीकरीता नि.क्र.१२ वर अर्ज सादर केलेला आहे. याकामी गैरअर्जदार याचे उत्पन्नाचे साधन रेकॉर्डवर आणण्याचे दृष्टीने अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे दिसून येते.

**०५** सदरचा अर्जावर म्हणणे देत असतांना गैरअर्जदार  यांनी स्वतःहून अर्जात नमूद मागणीतील कागदपत्र सादर करण्याबाबत उल्लेख अथवा खात्री दिलेली नाही. अर्जदार हिचे मुळ अर्जातील मागण्या पाहता गैरअर्जदार  याचे निश्चीत उत्पन्न न्यायालयासमोर येणे आवश्यक ठरते. अर्जदार हिने यापूर्वी सदर कागदपत्र मिळवण्याकरीता प्रयत्न केला किंवा कसे या बाबीचा अर्जदाराचे मागणीवर फारसा परिणाम होत नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे **रजनिश वि. नेहा** या न्यायनिवाडयातील निर्वाळयानुसार अशा प्रकारच्या पोटगी संदर्भातील मागणीच्या अनुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार या दोघांचाही उत्पन्नाचा पुरावा त्यांनी स्वतःहून न्यायालयासमक्ष सादर करणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्याने सत्य परिस्थीती न्यायालयासमोर येणार असून अर्जदार हिचा मूळ अर्ज गुणदोषांवर निकाली करणे सोयीचे ठरणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्जदार हिचा नि.क्र.११ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमूद विदयालयाचे मुख्याध्यापकांकडून गैरअर्जदार  याचे मार्च २०२६ या महिन्याचे वेतन पत्र/पगारपत्र मागवण्यात यावे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.04.17 16:28:58 +0530

(पी.व्ही.सपकाळ)

दिनांकः १७.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Harshali A. Uchade |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 17.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 17.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.04.2026 |